Volume-7, 2021

ISSN 2394-6903

# RAINBOW

*Multidisciplinary Peer Reviewed Annual Journal*

Shri Nagpur Gujarati Mandal's

**V. M. VASANT COMMERCE, J. M. THAKAR ARTS & J. J. PATEL SCIENCE COLLEGE**

Wardhaman Nagar, Nagpur-8

ISSN 2394-6903


| | | | |
|---|---|---|---|
| 42 | भूमंडलीकृत समाज में विकास बनाम विस्थापन | भावना पी.एच.डी. | 253 |
| 43 | हिन्दी और तेलुगु में वैज्ञानिक और तकनीकी शब्दावली का निर्माण | सुर्य कुमारी.पी. | 259 |
| 44 | बलुतेदारी प्रथा और महार मांग संबंध | सोनकांबळे पिराजी मनोहर | 264 |
| 45 | अस्तित्व की लडाई और डॉ.धर्मवीर | घाटे कैलास बलिराम | 271 |
| 46 | समाजातील समाजाचा परिवर्तनिय महामेरु– राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज | डॉ. दिलीप चव्हान | 276 |
| 47 | माझी जन्मठेप : वाङ्मयीन महात्मता | डॉ. तीर्थराज कापगते | 280 |
| 48 | आदीवासी मराठी कविता | डॉ. राखी जाधव | 287 |
| 49 | The Great Indian Robbery And Two Contemporary Historians | Dr. Supantha Bhattacharyya<br>Dr. Purabi Bhattacharyya | 292 |


## Gujarati


| | | | |
|---|---|---|---|
| 50 | ચાલો, શિક્ષણ જગતની યાત્રાએ... | શ્રીમતી વોલ્ગાબેન સંજયભાઈ ઠાકર | 298 |
| 51 | મધ્યકાલીન ગુજરાતી સાહિત્યમાં ધર્મ કેન્દ્ર સ્થાને ? | ઈલા વૃજલાલ શુક્લા | 302 |
| 52 | ગાંધી - ગીતા | ડૉ. પુજા પંડ્યા | 305 |
| 53 | શિક્ષણમાં માતૃભાષાનું મહત્વ | વિનયભાઈ ચંદુલાલ કાકુ | 307 |
| 54 | "ગુજરાતી અને સાહસ" | ડો. ભાવેશ ચંદ્રકાન્ત ભૂપતાણી | 310 |


## Science


| | | | |
|---|---|---|---|
| 55 | Synthesis of Benzimidazole Schiff's Bases & Its Derivative Catalysed by Copper Nanoparticles and Employment of India | Jay A. Tanna<br>R. B. Patil | 312 |
| 56 | Using Raspberry PI as OPC UA Device with Orange Wit Analytics Platform | Mrs Mugdha M. Ghotkar | 318 |

ISSN 2394-6903

# समाजातील समाजाचा परिवर्तनिय महामेरु- राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

**डॉ. दिलीप चव्हान**
**एस.आर.बी.टी. महाविद्यालय, मौदा**

सारांश :–

राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज हे समाजविषयी प्रेम करणारे अत्यंत मार्मीक अस व्यक्तीमत्त्व होय. साधी राहणी आणि उच्च विचारणी'' यांचे मार्मीक दर्शन घडविणे व आपले विचार गेलो त्या ठिकाणी पेरत जाणे हीच वैचारिक दृष्टी राष्ट्रसंताना माहाण बनवितो. समाजात राहूनच समाजाच आपण भल करु शकतो कारण या समाजाचे आपण देण लागतो असा विश्वास रुजविण्याचे कार्य राष्ट्रसंतानी केला त्यांच्या ग्रामगितेच्या माध्यमातून प्रत्येक थोर महात्म्यांचे दर्शन व त्यांनी प्रत्येक क्षेत्रावर केलेले विचार यातून खरच मानसाला माणूसपणाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच त्यांनी केलेली गावांगावामध्ये जणजागृतीचे कार्य मोलाचे ठरले.

ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्याच भाषेत आपण समजावून सांगावे म्हणजे आपण सरळ त्यांच्या मनाचा ठावा घेऊ शकतो हे राष्ट्रसंताना माहीत होते. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपले आपले कार्य जर पूर्ण केले तर समाजाला सुंदर ठेवता येते व पर्यायाने देशाला सुंदर बनविता येते हेच त्यांचे विचार त्यांना महान बनवितात. कमी शिकलेल्या व्यक्तीमध्ये न्युनगंड येऊन तो समाजाचा सामना करीत नाही. या उलट राष्ट्रसंतांनी त्याचा बाऊ न करता सोने केले. शिकलेला व्यक्ती समाजाच्या समस्या घेऊन त्यांच्या पूढे जाऊ शकत नाही, मात्र कमी शिक्षित व्यक्ती आपले कार्य प्रत्यक्ष कृतीतून करुन दाखविते. उच्चशिक्षितव्यक्तींनाही लाज वाटेल असे त्यांचे कार्य हे त्या वेळे प्रेरणा देत होत व आजही समाजातील प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा देत राहील. त्यांच्या कार्याचा वेध घेणारा हा लेख समर्पीत आहे.

प्रस्तावना :–

अमरावती जिल्हयातील शहीद यावली नावाच्या गावात यांचा जन्म झाला. त्याचें संपूर्ण नाव माणिकदेव बंडोजी ठाकूर (ब्रम्हभट) होय. त्यांचे लहानपणीचे नाव माणिक होते. प्रतीकूल परिस्थितीचे अनेक चटके त्यांनी लहानपणी सहन केले. त्याबाबत त्यांनी म्हटले आहे की,

''माझी जन्म यात्रा ऐकताना कोण हसतील मनी नवलाने।
हीन जातीचा, भाट गा कुळीचा घरीचा मुळीचा भिकारी मी।।
घरी पिता काम करी काम शिपीयाचे। त्यावरी आमुचे पोट चाले।।
तुकडयादास म्हणे शिकलोसे जरा। मराठा निसरा चौथा वर्ग।।''

केवळ चौथी शिकलेल्या राष्ट्रसंतांनी सुमारे ५०० ग्रंथांची निर्मिती केली अप्राशित वाङ्मयही बरेच आहे ही उर्जा त्यांना कुठून मिळाली या प्रश्नाचा विचार करतांना त्यांच्या आयुष्याचे अनेक कंगोरे समोर येतात. वडीलांच्या हेखेखोर वृत्तीला कंटाळून ते आणि त्यांची आई मामांकडे श्रीक्षेत्र वरखेडला राहत होते तिथे त्यांना लहानपणीच आडकोजी महाराजांचा सहवास लाभला. अडकोजींच्या निधनानंतर त्यांचे मन सैरभैर झाले. त्यांनी पंढरीचा रस्ता धरला. तिथे पंढरीनाथाचे पाय बराच वेळ धरल्यामुळे बण्यांचे फटके त्यांना खावे लागले. पंढरी ज्या पुडलिकामुळे वसली तिचा विचार त्यांच्या मनात आला. आई–वडिलांची सेवा करण्याचे ठरवून ते तिथून परत आले. त्यानंतर त्यांनी काही दिवस शिवण काम केले. पण मन काही रमत नव्हते साधना करण्यासाठी त्यांनी रामटेकचे वन जवळ केले. खडतर तपश्चर्येनंत अवनारी योगीराजांकडून त्यांना कृपाप्रसाद मिळाला साधना आणि सेवाधर्माचे आचरण करीत असतांना त्यांनी भजने करायला सुरुवात केली. विदर्भात त्यांच्या भजनांना तुफान गर्दी होत असे. त्यावेळी लोक ''बोला संत म्हणायला सुरुवात केली. विदर्भात त्यांच्या भजनांना तुफान गर्दी होत असे. त्यावेळी लोक ''बोला संत तुकडोजी महाराज की जय'' असे म्हणायचे तेव्हा ते मात्र ''सद्‌गुरु महाराज की जय'' असा गजर करीत असत.

राष्ट्रसंतांचे कार्य :–

देशात १९३० ते ४० हा कालखंड राजकीय धमाधुमीचा होता लोकांना एकत्र आणून त्यांच्यात राष्ट्रभक्तीचे बीज पेरण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केले जात होते राष्ट्र संतांनी या काळात अनेक मोठे यज्ञ केले त्यांनी १९३५ मध्ये सालबर्डीत तर ३६ मध्ये ठाकूरांच्या बागेत यज्ञ करुन लोकांना त्यांनी जागृत केले राष्ट्रभक्तीचे बाळकडू वऱ्हाडात पाजले.

त्यांच्या डफली आणि खंजिरी भजनांनी अन्यायी इंग्रजी राजवटी विरुद्ध तरुणांचे रक्त सळसळायचे. माझ्या प्रिय भारताला का हो धरला अबोला?

स्फुर्ती घा तरुणांशी ऐशी।
उद्धारु मायभू कैसी।
जातो धर्म लयाला।।

अशा गीतांतून जनजागृती बरोबर राष्ट्रधर्म जागविण्याचे काम त्यांनी केले. याच काळातच गांधीजी आणि राष्ट्रसंतांची वर्ध्याला भेट झाली. एक महिना राष्ट्रसंत गांधीजीजवळ रराहिले तिथून परत आल्यानंतर खादी वापरायला त्यांनी सुरुवात केली. स्वधर्म, स्वराष्ट्र, स्वसमाज, स्वावलंबन, स्वातंत्र्य याचे शिक्षण ते भाविकांना देत होते. त्यांच्या खंजिरी भजनांनी अनेक जण स्वातंत्र्याचे पाईक झाले. १९४२ मधील आष्टी आणि चिमूर सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांनी केले इंग्रजांच्या ही गोष्ट ध्यानात आल्यानंतर त्यांनी राष्ट्रसंताना अटक केली नागपूरच्या कारागृहात त्यांनी चार महीने कारावास भोगला. सुटका झाल्यानंतर दोन वर्षे वर्धा आणि चिमूर जिल्हयात भाषण करु नये, अशी बंदी त्यांच्यावर सरकारने घातली त्यानंतर राष्ट्रसंतांनी धार्मिक कार्याकडे लक्ष दिले. अनेक ठिकाणी नामसप्ताह केले.

वरखडेला संतसंम्मेलन भरविले १९४९ मध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडून १९४९ मध्ये त्यांना राष्ट्रसंत ही उपाधी मिळाली. भूदान चळवळीत विनोबा भावे यांच्याबरोबर त्यांनी काही दिवस दौरा केला. अकरा दिवसंत ११४१० एकर जमीन मिळाली.

ISSN 2394-6903

जागतीक व्याप्ती

जपानमध्ये १९५५ मध्ये भरलेल्या जागतीक धर्मपरिषदेत त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले. त्यांनी उफली आणि खंजेरीच्या स्वराची आपल्या भाषणाला जोड दिली. अवघी धर्म परिषद त्याने दूमदूमन गेली. त्यावेळी १८ देशांच्या समीतीचे सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती झली. स्वामी विवेकानंदांच्या नंतर त्यांनाच हा मान मिळाला. त्याच वर्षी विदर्भ साहित्य सम्मेलन तुमसर सम्मेलनात त्यांचा थोर साहित्यिक म्हणूनही गौरव करण्या आला. याच संम्मेलनात आणि विदर्भात शंभर गावात एकाच वेळी त्यांच्या ग्रामगीतेचे प्रकाशन करण्यात आले.

''खरे नाम निष्काम ही ग्रम सेवा
झटू सर्व भावे करु स्वर्ग गावा.''

शैक्षणिक कार्य :—

समाजातील शा तबक्यातील वर्गाच नेतृत्व त्यांनी केल ज्यात व्यक्तीला शिक्षणाची बंदी होतो. प्रत्येक व्यक्तीने शिक्षण घेतले पाहीजे. मुलाबाळांना शिकवून मोठे केले पाहीजे हाच त्यांचा हेतू होता. तो म्हणत असत.

''दगळावर तेल ओतण्यापेक्षा
पोराले शिकवा त्यांले मोठ करा
त्यांचे भल होइल बापाओ।
एक दिवस उपाशी रावा।
मोटाले चिमटे लागतील ते सोसा
पण आपल्या बोराबारांले शाळेत पाठवा.''

हीच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हयांची वाणी अतिशय साध्या शब्दांच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचून त्यांना प्रेरीत करणारी होती. प्रत्येक मुलाने शिक्षण घेतले पाहीजे. तरच तो मोठा होइल इतर व्यक्ती आपल्याला कोणत्याप्रकारे फसवितात. लुबाडतात याची शहणीशा करील. कारण शिक्षण हे एकमेव हत्यार आहे ज्याने प्रत्येक व्यक्ती हा जागतिक पातळीवरचे विचार करु शकतो. आपल्या बरोबरच घराची व परिस्थिती सुधारु शकतो पर्यायाने समाज व देशाचा विकास निश्चितच होईल.

राष्ट्रसंत कमी शिक्षण घेतलेले होते मात्र त्यांचे विचार हे की प्रत्येक व्यक्तीने जर शिक्षण घेतले तर वैचारिक दृष्टिकोणाचा विकास होतो. सामाजिक संबंध सदृढ होतात. समाजाविषयी प्रेम व आपूलकीची भावणा निर्माण होते. विचारांत परिपक्वता निर्माण होते.

समाजातील गलीच्छ वस्त्या सुधारावयास शिक्षण हे महत्वाचे हत्यार ठरले कारण जोपर्यंत आपण शिक्षाण घेणार नाही तोपर्यंत मात्र आपण आपला विकास करु शकणार नाही प्रत्येक व्यक्तीच्या मनाने विकास होणे कारक ठरते.

सामाजिक कार्य :—

तुकडयादास म्हणे या वाक्याने भजनाची समाफ करीत असतांना समाजातील विविध समस्यांची त्यांना जाणिव होती. प्रत्येक व्यक्ती हा समाजशील प्राणी आहे. आपले जिवण हे अनमोल आहे. त्या मार्गाने आपण चालले जावे जे

 ISSN 2394-6903

सद्कर्मी असे ते म्हणत असत. ज्या गावामध्ये त्यांच्या भजनाचा किंवा किर्तणाचा कार्यक्रम असे त्या गावात ते सकाळी उठून सर्व गावातील मंडळींना जागे करीत, त्या संपूर्ण गावातील परिसर आधी स्वचछ दिसावा यासाठी झाडून घेत निश्चितच या कामामध्ये गावाकऱ्यांनी साथ लाभावी यासाठी ते जोमाने कार्यरत असत. समाजातील प्रत्येक वर्गाने एकत्रित येऊ समाजकार्य करावे, कोणताही व्यक्ती उच्च नाही किंवा निच्च नाही अमार नाही किंवा गरीब नाही. सर्व परमेश्वराची लेकरे आहेत असे त्यांचे मत होते. प्रत्येक व्यक्तीला परमेश्वराने समान अंग दिलेले आहेत. प्रभूची लेकरे आहेत त्यामुळे त्यांचा देखील या धरतीवर तेवढाच हक्क आहे जेवढा इतर समाजातील लोकांचा असे त्यांचे मत असे.

देवांवर खर्च करण्यापेक्षा स्वत:चे जिवनमान बदलविण्यासाठी करावा असा त्यांचा नेहमीच मार्मीक सल्ला असे. समाजजीवन बदलून टाकण्यासाठी पूर्वी स्वत:ला बदलावे लागेल. स्व:यपूर्ण बनाव लागेल. कोणत्याही देवाची वारि करण्यापूर्वी आपल्या मुलाने शिक्षण घेतले तर तो समाजाच्या कामी येईल याची त्यांना पूरेपूर खात्री होती. प्रत्येक व्यक्तीने समाजशील राहावे व याची जोड उद्योग धंदयात असावी असा देखील सल्ला ते समाजाला देत असत.

'समाज उन्नत तर देश उन्नत' अशी त्यांची खात्री होती. समाजाने एकत्र येऊन कार्य करावे व त्याच बरोबर एकोप्याची भावना ठेवावी. त्यामुळे देश आपला अधिकच प्रगत होइल असे त्यांचे म्हणणे होते.

संदर्भ

१) श्री. तुकडोजी महाराज अखिल भारतीय धर्म गुरुदेव सेवा मंडळ

२)लाहर्की बरखा भाग १, २ आणि ३

३)अनुभव प्रकाशन भाग १ आणि २

४)सकाळ दै. वृत्तपत्रातील लेख

५)लोकमतदै. वृत्तपत्रातील लेख

६)हितवाददै. वृत्तपत्रातील लेख